**<u>प्रतिवादी क्र. ३/१ ते ३/३ तर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. जी. नारायणकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू:–</u>**

७. मला लिहता वाचता येते. माझ्या सांगण्यावरून माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जबाब दावा माझ्या सांगण्याप्रमाणे दाखल करण्यात आले आहे. माझ्या पतीला एक भाऊ अमोल शिंदे व एक बहिण बबिता शिंदे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सास–यांना (प्रतिवादी क्र.१) वादमिळकत वाटणीत मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१५ च्या पुर्वी संपुर्ण मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या नावाने होती. सन २०१५ साली आम्हाला वाटणीपत्राअधारे जमिन वाटुन देण्यात आली. सदर वाटणीपत्र नोंदणीकृत आहे. वाटणीपत्रावर कोणाच्या सहया आहेत याची माहिती मला नाही. वाटणीपत्र कोणत्या तारखेला व कोठे झाले याची माहिती मला नाही. माझ्या पतीने मला वाटणीपत्र औसा येथे झाले असे सांगितले.

८. वाटणीपत्र करताना शेताची मोजणी करण्यात आली नाही. कोणाला कुठल्या बाजुचा हिस्सा देण्यात आला हे मला माहिती आहे. माझ्या पतीने मला सांगितले की, दिशा दाखवुन त्याप्रमाणे जमिन नावावर करून

दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अल्पभुधारकाचा फायदा मिळावा म्हणुन जमिनी आमच्या नावावर करून दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, वादी व माझे एकदाच लग्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, वादी लग्न झाल्यापासून सासरी राहत आहे.  वाटणीपत्राअधारे जमिनी वाटुन दिल्या याबाबत वादीला कळविले किंवा नाही हे मला माहित नाही.

९. माझ्या नावावर अडीच एकर शेती आहे. प्रतिवादी क्र.१ च्या नावाने अडीच एकर जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटणी झाल्यापासून प्रतिवादी क्र. १ त्यांची शेती करून खातात. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादी क्र. १ ची देखभाल करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ची देखभाल वादी करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी ही प्रतिवादी क्र. १ ची देखभाल करत असल्याने प्रतिवादी क्र. १ ने तिच्या नावाने जमिन बशिक्ष पत्र करून दिली. बशिक्ष पत्र खोटे आहे व ते रद्द करण्याकरिता आम्ही न्यायालयात दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बशिक्ष पत्राअधारे सध्या वादी जमिन करून खात आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, एकत्र कुटूंबाची जमिन असल्याने वादीचा सदर जमिनीवर कायदेशीर हक्क आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, वादीच्या लग्नाचा खर्च करून तिला तिचा हक्क देण्यात आलेला आहे. हे

म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३० ही जमिन माझ्या लग्नाच्या पुर्वी विकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिन कौटुंबिक गरजेपोटी विकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे खोटे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला कायदेशीर हक्क मिळु नये म्हणुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.06.09 15:27:49 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–०९.०६.२०२६

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.